प्रेस नोट ०८ दिनांक २९/०३/२०२४

## ''चुनाभट्टी पोलीसांनी खंडणी व लूटमार करणा-या आरोपीतांस दोन तासात अटक केलेबाबत''

फिर्यादीस त्याचे पाण्याचे पाईप लाईनचे काम करण्याकरीता पिंटया भाई किंवा फल्लेभाई याचे गँगला हप्ता दयावा लागेल असे धमकाविले व खंडणी न दिल्याने फिर्यादी यांस चाकूचा धाक दाखवून जीवे ठार मारण्याची धमकी दिली आणि खिशातील २,०००/- रू. जबरदस्तीने काढून घेतले आणि त्यांचे कामकाजाचे ठिकाणावरील पाईप लूटमार करून घेवून गेल्याची तक्रार प्राप्त झाल्याने कलम ३९२, ३८७, ५०४, ५०६(२), ३४ भादविसह ३७(१) (अ), १३५ मपोका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

सदर गुन्हयाच्या तपासकामी पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ६, मुंबई श्री हेमराजसिंह राजपूत व वरिष्ठ पोलीस निरीक्षक, चुनाभट्टी पोलीस ठाणे, मुंबई श्री अंकुश गायकवाड यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस पथक तयार करण्यात आली. सदर पथकाने सापळा रचून आकाश खंडागळे, उमेश मारूती फल्ले, राकेश उर्फ पिंन्टया रमेश राणे, सूधीर बेटकर व ऋषिकेश भोवाळ यांचेविरूध्द आरोपीतांस दोन तासाचे आत अटक केली. सदर आरोपीत हे अभिलेखावरील आरोपीत असून त्याचेंविरोधात शरीराविरूध्दचे व मालमत्तेविरूध्दचे तसेच शस्त्र अधिनियम अन्वये गुन्हे दाखल आहेत. गुन्हयाचा पुढील तपास सपोनि नवनाथ काळे करीत आहेत.

सदरची उल्लेखनीय कामगिरी मा.अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग श्री महेश पाटील, मा. पोलीस उप आयुक्त, श्री हेमराजसिंह राजपूत, चुनाभट्टी पोलीस ठाणचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री अंकुश चौधरी यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक विक्रम चव्हाण, सपोनि नवनाथ काळे, सपोनि प्रदिप पाटील, पोउनि डमरे, पोउनि साळुंखे, सफौ, गायकवाड, घाडगे, पोह पांढरे, बनकर, पोशि यमगर, पाटील, शेटे, कोळसे यांनी केली आहे.

------------------